**कृपया प्रसिद्धीसाठी** **21 जून 2012**

## भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी 21 जून 2012 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *मुख्यमंत्री कुष्ठपीडितांचे प्रश्न सोडविणार : राम नाईक*

**मुंबई,गुरुवार:** ''महाराष्ट्रातील कुष्ठपीडितांच्या गेली चार वर्षे प्रलंबित असलेल्या अकरा मागण्यांचा सकारात्मक विचार करुन लवकरच निर्णय घेऊ'', असे आश्वासन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपाचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक आणि विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या कुष्ठपीडितांच्या प्रतिनिधी मंडळाला बुधवारी दिले आहे. शिष्टमंडळात महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री. बळीराम तांबडे, संघटनेचे सल्लागार श्री. भिमराव मधाळे, निमंत्रक श्री. रसुल मुल्ला यांच्यासह सर्वश्री सफी शेख, विजय पाटील, पांडुरंग धनावटे, मोहन पंध्राम आणि प्रकाश पाटील यांचा समावेश होता. ही माहिती श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत एका पत्रकार परिषदेमध्ये दिली. त्यावेळी महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री. बळीराम तांबडे आणि सल्लागार श्री. भिमराव मधाळे हजर होते.

कुष्ठपीडितांच्या प्रश्नांसंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,'' कुष्ठपीडितांनी वसविलेल्या स्वयंभू 39 वसाहतींमधून महाराष्ट्रात सुमारे 65 हजार कुष्ठपीडित राहातात. त्यांच्या प्रश्नांसंबधी 6 ऑगस्ट 2008 रोजी म्हणजे जवळ-जवळ चार वर्षांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्याशी चर्चा होऊन त्यांनी काही निर्णय घेतले होते. तथापि पाठपुरावा करुनही त्या निर्णयांची अंमलबजावणी झाली नाही. भारतातील कुष्ठरोगाचे 2005 मध्ये निर्मूलन झाले आहे असा दावा भारत सरकारने केला होता. तथापि 13 मार्च 2012 रोजी आरोग्यमंत्र्यांनी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना देशात 1,26,800 नवे कुष्ठरुग्ण आढळल्याची धक्कादायक माहिती दिली. जगभरात आढळलेल्या 2,28,474 कुष्ठरुग्णांच्या तुलनेत हे प्रमाण 55.5 टक्के आहे. महाराष्ट्रातही 2010 मध्ये 15,498 नवे रुग्ण आढळून आले आहेत. या गंभीर समस्येची चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेण्यात आली होती.''

श्री. राम नाईक पुढे म्हणाले,‘‘चर्चेच्या शेवटी कुष्ठपीडितांच्यावतीने सादर करण्यात आलेल्या अकरा मागण्यांसंबधी सहानुभूतीपूर्वक विचार करुन लवकर निर्णय घेऊ असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.’’ त्या मागण्या पुढील प्रमाणे आहेतः 1) ज्याप्रमाणे स्वयंसेवी संस्थामध्ये राहाणा-या कुष्ठरुग्णांच्या अनुदानात वाढ करुन 1 एप्रिल 2012 पासून प्रति व्यक्ती दरमहा रु. 2,000 करण्यात आले आहे, त्याप्रमाणेच स्वयंभू कुष्ठवस्त्यांमधून राहणा-या कुष्ठपीडितांनाही प्रति व्यक्ती दरमहा रु. 2,000 निर्वाह भत्ता देण्यात यावा. 2) कुष्ठपीडित कुटुंबांना दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना मिळणा-या सर्व सवलती, विशेषतः जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा. 3)कुष्ठपीडितांच्या तरुण मुलांना रिक्षा परमीट मिळावे. 4) राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीने सादर केलेल्या शिफारशी अंमलात आणाव्यात. 5) ज्या ठिकाणी कुष्ठरुग्णांच्या वसाहती आहेत ती जागा त्यांच्या नावे करुन 7/12 वर तसा उल्लेख व्हावा व त्यांचे पुनर्वसन करावे. 6) पाणीपट्टी, घरपट्टी व वीजदेयकांमध्ये 75% सवलत मिळावी. 7) कुष्ठरुग्णांना स्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध करुन द्यावे. 8) कुष्ठरुग्णांच्या सुशिक्षित मुला-मुलींना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. 9) कुष्ठपीडितांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी 75% सवलत मिळावी. 10) कुष्ठरुग्णांच्या वसाहतीमध्ये ड्रेसींगसाठी देण्यात येणारी औषधे व गॉज-बॅन्डेज वेळेवर तसेच पुरेशा प्रमाणात देण्यात येत नाहीत, ती देण्यात यावीत. 11) कुष्ठरोग पुनर्वसन समिती गेली 12 वर्षे पसून अस्तित्वात नाही, ती समिती गठीत करुन त्यामध्ये महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या दोन सदस्यांचा समावेश करण्यात यावा, जेणेकरुन कुष्ठरुग्णांच्या समस्या सोडविणे सुकर होईल.

**(कार्यालय सचिव)**